# :: प्रेस नोट ::

## आरोपी मार्कंड फंदिराम नदेश्वर पद—विभागीय लेखा अधिकारी, म.रा.प. भंडारा यांना कारावासाची शिक्षा

तक्रारदार यांनी भविष्य निर्वाह निधी मधून १,००,०००/—रूपये कर्ज मिळण्यांकरीता दिलेला अर्ज वरिष्ठांना मंजूरीसाठी सादर करण्याकरीता आरोपी लोकसेवक मार्कंड फंदिराम नदेश्वर पद—विभागीय लेखा अधिकारी, विभाग नियत्रण, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, भंडारा यांनी तक्रारदार यांना ४००/—रू लाचेची मागणी करून स्विकारल्याने त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन भंडारा येथे अप. क्र. ३०८६/१३ कलम ७,१३ (१) (ड), १३ (२) ला.प्र. कायदा १९८८ अन्वये दि. ०६/०४/२०१३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

मा. श्री सचीन बी. भंन्साली, अतिरिक्त सत्र न्यायाधिश, विशेष न्यायालय, भंडारा यांचे न्यायालयात सदर खटला चालविण्यात आला. दि. ०४/०५/२०१९ रोजी मा. न्यायालयाने आरोपी मार्कंड फंदिराम नदेश्वर पद—विभागीय लेखा अधिकारी, म.रा.प. भंडारा यांना कलम ७ लाप्रका मध्ये ३ वर्षे कारावास व २०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास २ महिने साधा कारावासाची शिक्षा व १३, (१) (ड), सह कलम १३ (२) लाप्रका. अन्वये ३ वर्षे कारावास व १०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालिन पोलीस निरीक्षक, अशोक देवतळे, लाप्रवि भंडारा यांनी पुर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षाचे वतीने जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. श्रीमती. दुर्गा तलमले यांनी काम पाहिले व त्यांना श्री महेश चाटे, पोलीस उपअधीक्षक श्री योगेश्वर पारधी, पोलीस निरीक्षक, पो.हवा. रविंद्र गभने, पो. शि. संदिप पडोळे, लाप्रवि. भंडारा यांनी सहाय्य केले.

श्री श्रीकांत धिवरे पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर परिक्षेत्र तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाशी संपर्क साधावा.

SP ACB Nagpur- 7040222221
Landline no. - 0712/ 2561520
Toll Free No. 1064
Website:- www.acbmaharashtra.gov.in
Mobile App:- www.acbmaharashtra.net
Facebook Page:- www.facebook.com/MaharashtraACB
Whatapp No- 9930997700

D.C.P./S.P. Anti Corruption Bureau ★Nagpur★

(विजय माहुलकर)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर